# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.05.2024** **वारःबुधवार**

---

1) पुण्यातल्या कल्याणीनगर भागात झालेल्या अपघातप्रकरणी कठोर कारवाई करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश. अल्पवयीन आरोपीच्या वडिलांसह चार जणांना अटक

2) इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, यंदाही मुलींची बाजी

3) उजनी जलाशयात बोट बुडाल्यानंतर सातजण बेपत्ता, नाशिकच्या भावली धरणात बुडून पाच जणांचा मृत्यु आणि

4) राज्यात येत्या तीन दिवसांत तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस तर काही भागात उष्णतेची लाट कायम

**<u>अपघात</u>**

पुण्यातल्या कल्याणीनगर भागात झालेल्या अपघातप्रकरणी कुणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्याच्या पोलीस आयुक्तांना दिले. भरधाव कार चालवून दोन तरुणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाचे वडील, विशाल अग्रवाल यांना काल छत्रपती संभाजीनगर इथून अटक करण्यात आली. अल्पवयीन मुलांना मद्य दिल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी बार मालक आणि व्यवस्थापकाला देखील ताब्यात घेतलं आहे. विशेष न्यायालयानं त्यांना 24 मे पर्यन्त कोठडी दिली आहे. सुधारित बालगुन्हेगारी कायद्यातल्या तरतुदींनुसार पोलिसांनी या प्रकरणी अल्पवयीन आरोपीवर कलम ३०४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. वाहन चालवण्याचं रीतसर प्रशिक्षण आणि परवाना नसूनही अल्पवयीन आरोपीच्या वडिलांनी त्यांची कार त्याला दिल्याची माहिती अल्पवयीन आरोपीनं पोलिसांना दिली होती. यानंतर उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाची दखल घेत पोलिसांना निर्देश दिले होते. नियमांचं उल्लंघन केलेले पब आणि बार बंद करण्यात येतील. तसंच नवीन परवाना देताना रहिवासी भागांमधे देण्यात येणार नाहीत असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणाच्या तपासाची माहिती फडणवीस यांनी काल पुण्यात घेतली. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ...

पुण्याच्या कल्याणी नगर भागात घडलेली दुर्घटना, त्यातील आरोपींना सुरुवातीला मिळालेली वागणूक आणि त्यावर पुणेकर नागरिकांनी व्यक्त केलेल्या संतापाच्या भावनेची योग्य दखल घेऊन राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यात आले आणि याप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईचे आदेश त्यांनी दिले . गृहमंत्र्यांच्या योग्य त्या निर्देशानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाशी संबंधित दोन पब चे परवाने रद्द केले आहेत. वस्तुतः पुण्यालां चारही बाजूंनी पबचा विळखा पडला असून पहाटेपर्यंत या पबमधून डी जे चा दणदणाट सुरू असतो आणि मद्याचा महापूर वहात असतो . पोलिसांनी निर्धारित केलेले वेळेचे बंधन हे पब मालक कधीच पळत नाहीत. आता त्यांच्यावर कारवाई होऊ शकते हा कठोर संदेश या कारवाईनंतर जाईल. त्यामुळं सर्वप्रथम त्यांना कायद्याच्या चौकटीत राहण्याची शिकवण द्यावी लागणार आहे. सोबतच कायद्यानुसार पालकांनी आपल्या मुलांच्या वर्तनावर लक्ष ठेवणे किती महत्वाचे आहे ही बाब सर्वांनीच कायम लक्षात ठेवायची आहे. हा बोध होण्यासाठी आणखी एखाद्या घटनेची वाट पाहायला नको! आकाशवाणीच्या बातम्यांसाठी पुण्याहून विनायक सोमणी.

दरम्यान, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी,अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<u>इंट्रो</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात नऊ विभागीय मंडळांच्या घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीचा निकाल काल मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी काल जाहीर केला. यंदा या परीक्षेत 93 पूर्णांक 37 शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ऐकूया याविषयी अधिक वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

**स्क्रीप्ट**

**यंदा बारावीच्या परीक्षेसाठी राज्यातील नऊ विभागीय मंडळातून 14 लाख 23 हजार 970 नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी 13 लाख 29 हजार 684 जण उत्तीर्ण झाले आहेत, याची टक्केवारी 93 पूर्णांक 37 टक्के इतकी आहे. गेल्यावर्षी पेक्षा यंदा 2 पूर्णांक 12 टक्क्यांनी निकाल वाढला आहे. या परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी 95 पूर्णांक 44 टक्के इतकी आहे. तर 91पूर्णांक 60 टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदा कोकण विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी सर्वाधिक असून यात 97 पूर्णांक 51 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर सर्वात कमी निकाल हा मुंबई विभागाचा असून त्याची टक्केवारी 91 पूर्णांक टक्के 15 इतकी आहे.पुणे विभागाचा निकाल 94 पूर्णांक 44 टक्के इतका आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण सर्वाधिक असून यात 97 पूर्णांक 82 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण 154 विषयांपैकी 26 विषयांचा निकाल हा 100 टक्के आहे. यावेळी 94 पूर्णांक 20 टक्के दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे**

**सीमा**

या परीक्षेत छत्रपती संभाजीनगर ची तनिषा सागर बोरामणीकर ही पैकीच्या पैकी गुण मिळवणारी राज्यातली एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. तिला 518 गुण मिळाले असून यातील 18 गुण क्रीडा नैपुण्याचे मिळाले आहेत. तनिषा ही आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू असून आपल्या कामगिरीविषयी तिनं आकाशवाणीशी संवाद साधला....

**खते**

राज्यात यंदा २०२४-२५ च्या खरीप हंगामात ४८ लाख टन खत पुरवठयाचं नियोजन प्रस्तावित आहे. त्यामध्ये केंद्र सरकारनं महाराष्ट्राला ४५ लाख ५३ हजार टन खत पुरवठयाचं नियोजन मंजूर केलं आहे. युरिया आणि डीएपी या खतांचा संरक्षित साठा करण्याचा निर्णय शासनानं घेतला असून खताच्या किंमतीत कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याची माहिती पुणे कृषी संचालक विकास पाटील यांनी दिली. युरिआ खताच्या विक्री किंमती स्थिर असून, ४५ किलो गोणीचा दर २६६ रूपये ५० पैसे असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, आगामी खरीप हंगामात लातूर जिल्ह्यातील केंद्रांवरून बियाणं, खतं, कीटकनाशकांबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी आणि फसवणूक टाळण्याकरिता जिल्हा आणि तालुकास्तरावर ११ तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

**निधन**

स्टेट बँक अधिकारी संघटना, तसंच स्टेट बँक निवृत्तीवेतनधारक संघटनेचे माजी सचिव एन बी.कुलकर्णी यांचं काल अल्पशा आजारानं मुंबईत निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर काल पुण्यात वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

**बुडाले**

उजनी धरणाच्या जलाशयामध्ये प्रवासी वाहतूक करणारी नौका वादळी वाऱ्यामुळे बुडाल्यानंतर सात प्रवासी बेपत्ता आहेत. इंदापूर तालुक्यातील कळाशी इथून सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कुगावकडे ही नौका प्रवास करत होती. एकजण पोहून किनाऱ्यावर आला.

नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी तालुक्यातील भावली धरणात काल ५ जणांचा बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन मुलं आणि तीन मुलींचा समावेश आहे. ते नाशिकरोड भागातील रहिवासी होते. काही जण आंघोळीसाठी पाण्यात उतरले असता, एक जण बुडत असल्याचं पाहून त्यांना वाचवण्यासाठी इतर तिघांनी पाण्यात उड्या घेत त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र पाचही जण खोल पाण्यात बुडाले. त्यांना वाचवण्यासाठी स्थानिक तरुणांनी पाण्यात उड्या घेतल्या, मात्र त्यांच्या प्रयत्नांना यश आलं नाही. पाचही मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले.

**<u>पाऊस</u>**

हिंगोली जिल्ह्यातील वरुड चक्रपाण शिवारात काल दुपारी वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी झाडं उन्मळून रस्त्यावर पडली, घरांवरचे पत्रे उडाले असून, महावितरणचे खांबही उन्मळून पडले आहेत. सांगली जिल्ह्यातल्या काही भागातही काल विजा आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. यामध्ये मिरज तालुक्यातील चाबूकस्वारवाडी इथं एका विहीर कामगाराचा तर शिराळा तालुक्यातील गिरजवडे इथल्या एका व्यक्तीचा वीज पडून मृत्यू झाला. 2 जण जखमी झाले. विजांचा प्रचंड कडकडाटासह रत्नागिरी तालुक्यात काल रात्री अनेक ठिकाणी पाऊस पडला.

**<u>हवामान</u>**

नैऋत्य मोसमी पावसाची प्रगती सुरु असून, मालदीवचा काही भाग, दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटं आणि दक्षिण अंदमान समुद्रात तो आणखी पुढे सरकला आहे. राज्यात येत्या तीन दिवसांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.मात्र, राज्याच्या काही भागात उष्णतेची लाट कायम असून काल सर्वात जास्त कमाल तापमान जळगाव इथं 43 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार